## —: जाहिर निविदा :—

यादवारे आपणास कळविणेत येते की, मा. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, अहमदनगर या न्यायालयाचे आवारात फक्त न्यायालयीन कागदपत्राच्या छायांकित प्रती काढणेसाठी विहित कार्य पध्दतीचा अंवलब करून व मा. उच्च न्यायालयाच्या करारनाम्यातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नवीन झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडरचे कामासाठी अपंग व्यक्तीची किंवा इच्छुक व्यक्तींची झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणुन नेमणुक करावयाची असुन त्यासाठी त्यांच्याकडे स्वत:ची झेरॉक्स मशीन असणे आवश्यक असून झेरॉक्स कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

तरी वरील कामासाठी इच्छुक व्यक्तींनी किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन नं. ७४३/२०१३ अन्वये अपंग व्यक्तीनां झेरॉक्स सर्व्हीस प्रोव्हायडर म्हणून प्राधान्य देण्याचे असल्याने अपंग व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक ०२/०७/२०२४ अखेर सायंकाळी ०६:०० पर्यंत मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, अहमदनगर येथे सादर करावेत. तसेच अपंग व्यक्तींना प्राधान्य दिले जाणार असल्यामुळे अर्जासोबत अपंग प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडण्यात यावी.

तसेच मा. महोदयांच्या तोंडी आदेशान्वये झेरॉक्स सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणून नियुक्त करण्यात येणा—या व्यक्ती/फर्मकरीता झेरॉक्स ऑउटसोर्सिंगच्या कामासाठी ए—४ कागदाकरीता रुपये १—२५ पैसे, लिगल कागदाकरीता रुपये १—५० पैसे व ए—३ कागदाकरीता रुपये २—०० अशी रक्कम आकारण्यासाठी मंजूरी देणेबाबत विचाराधिर आहे. दि. ०२/०७/२०२४ रोजी सायंकाळी ०६:०० नंतर येणा—या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २०/०६/२०२४ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे.

हुकूमावरुन,

(सही) २०.६.२४

सहा. अधिक्षक,
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय,
अहमदनगर

मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, अहमदनगर
दिनांक :— २०/०६/२०२४

**प्रत :—**

१. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अहमदनगर, यांचे नोटीस बोर्ड
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट
६. पंचायत समिती

७. भुमी अभिलेख कार्यालय
८. जिल्हा रुग्णालय, अहमदनगर
९. नगर परीषद कार्यालय
१०. एस.टी. स्टॅण्ड कार्यालय
११. कृषी कार्यालय